ॐ

---धर्मो विश्वस्य जगतः प्रतिष्ठा---

स्वधर्म पुस्तकमाला

४

# हिंदुधर्म-तत्त्वसंग्रह

卐

लेखक
विद्यानिधि
सिद्धेश्वर शास्त्री चित्राव

प्रकाशकः—गंगाधर विश्वनाथ गोखले,
स्वधर्म कार्यालय २७ बुधवार पुणें.

सन १९२५ इसवी.

# प्रस्तावना.

हिंदु धर्माचीं तत्त्वें लहानापासून थोरापर्यंत सर्वांस थोडक्यांत कशीं अवगत करून देतां येतील या तळमळीनें हा प्रयत्न केला आहे. ग्रंथविस्तार धर्माच्या जुनेपणामुळें आणि संग्राहकबुद्धीनें अत्यन्त वाढलेला आणि बारीकसारीक गोष्टींचा सुद्धां अत्यंत खोलपणानें व विस्तारपूर्वक विचार केलेला असल्यामुळें मुख्य सिद्धान्तावरून शहाण्यांची सुद्धां दृष्टि चलित होते, असा वारंवार अनुभव येतो. ही स्थिति सुधारणें अत्यन्त जरूर आहे म्हणून हा छोटासा नमुन्यादाखल उपक्रम करण्यांत येत आहे. साधारणपणें खोल न शिरतां ठोकळ गोष्टी मांडल्या आहेत. तथापि कांहीं ठिकाणीं मतभेद किंवा प्रमाद होण्याचा संभव राहणारच; त्याला नाइलाज आहे. योग्य सूचनांचा आम्ही अत्यंत आदरपूर्वक उपयोग करूं.

वेद, स्मृति आणि पुराणें यांचीं नांवें वगैरे आम्ही मुद्दाम सविस्तर दिलीं आहेत. त्याकडे प्रत्येक वाचकानें अवश्य लक्ष पुरवावें. आपल्या ग्रंथसंपत्तीची हेळसांड ही केव्हांहि आपल्याला कमीपणा आणणारीच आहे, ही गोष्ट वाचकांनीं ध्यानांत धरावी.

यापूर्वी आम्ही लिहिलेलें धर्मशिक्षण पुस्तक पुष्कळच लोकांना पसंत पडलें. पुणें येथील भारतहायस्कूलच्या चालकांनीं आपल्या शाळेंत व पुणें शहर म्युनिसिपालिटीतील सर्व शाळांत आमचें पुस्तक धर्मशिक्षणाकरितां लाविलें आहे. व इतर कांहीं संस्थांनीं लावण्याचें आश्वासन देऊन या कामीं उत्तेजन दिलें आहे याबद्दल आम्ही त्यांचें आभारी आहों.

सिद्धेश्वरशास्त्री चित्राव.

# हिंदुधर्म तत्त्वसंग्रह.

## धर्म म्हणजे काय?

प्रश्न:—धर्म म्हणजे काय?

उत्तर:—साक्षात् ऐहिक उत्कर्ष साधून पारमार्थिक उत्कर्षाला म्हणजे मोक्षाला नेणारा तो धर्म होय. ( साक्षादभ्युदयनिःश्रेयससाधनः धर्मः )

---

## धर्म श्रेष्ठ कोणता ?

प्रश्न:—जगांत सर्वांत श्रेष्ठ आणि प्राचीन धर्म कोणता ?

उत्तर:—वैदिक धर्म होय. त्यासच हिंदु धर्म असें म्हणतात.

प्रश्न:—हिंदुधर्म सर्वांत श्रेष्ठ कशावरून ?

उत्तर:—*हिंदूधर्मच सर्वांत जुना असून अनेक धर्मांचे आघात झाले तरी त्याची परंपरा सतत टिकली आहे. तसेंच तो सर्वसंग्राहक म्हणजे अनंत कालांतील अनुभवानें ग्राह्य ठरलेल्या सर्व तत्त्वांचा व आचारांचा संग्रह करणारा असल्यामुळें सर्वश्रेष्ठ व सनातन म्हणजे कायम टिकणारा आहे.

---

## हिंदुधर्माची व्याख्या

प्रश्न:—हिंदु कोणाला म्हणतात?

उत्तर:—वेद किंवा वेदमूलक ग्रंथ यांपैकीं कोणताहि ग्रंथ जो

---

* टीप—बुद्धधर्म ( ख्रि. पू. ७०० ) यहुदी ( ख्रि. पू. ४०० ) महंमदी ( इ. स. ६०० )

प्रमाण मानतो त्यास *'हिंदु' असें म्हणतात.

## हिंदूंचा धर्मग्रंथ

प्रश्नः–हिंदूंचा धर्मग्रंथ कोणता?

उत्तरः–हिंदूंचा धर्मग्रंथ **वेद होय.

प्रश्नः- वेद कशाला म्हणतात ?

उत्तरः–ईश्वरप्रणीत ग्रंथांना 'वेद' असें म्हणतात.

प्रश्नः–वेद किती आहेत?

उत्तरः–मूळ वेद एकच; परंतु सोईच्या दृष्टीनें व ऐतिहासिक परंपरेस अनुसरून सुरक्षिततेकरितां वेदाचे चार भाग केले आहेत. त्यांना ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, आणि अथर्ववेद असें म्हणतात.

---

*लो. टिळक यांची हिंदुधर्माची व्याख्या.

प्रामाण्यबुद्धिर्वेदेषु साधनानामनेकता ।
उपास्यानामनियम एतद्धर्मस्य लक्षणम् ।।
धर्ममेनं समालम्ब्य विधिभिः संस्कृतस्तु यः ।
श्रुतिस्मृतिपुराणोक्तैः क्रमप्राप्तैरथापि वा ।।
स्वे स्वे कर्मण्यभिरतः श्रद्धाभक्तिसमान्वितः ।
शास्त्रोक्ताचारशीलश्च स वै हिन्दुः सनातनः ।।

(१) वेदप्रामाण्य (२) साधनांचें अनेकत्व (मोक्षप्राप्तीचें ज्ञान, कर्म, भक्ति इत्यादि मार्ग मानणें) (३) उपास्याबद्दल अनियमितपणा हें हिंदू धर्माचें लक्षण आहे. या धर्मास अनुसरून श्रुति, स्मृति पुराणोक्त किंवा परंपराप्राप्त अशा विधींनें संस्कार पावलेला श्रद्धाळु, स्वकर्मतत्पर आणि शास्त्रांत सांगितलेले आचार पाळणारा त्यास हिंदु असें म्हणतात.

---

** शेवटीं कोष्टक जोडलें आहे, ते पहावें.

प्रश्नः—वेदांत कोणकोणत्या ग्रंथांचा समावेश होतो ?

उत्तरः—संहिता, ब्राह्मण, आरण्यक आणि उपनिषदें.

प्रश्नः—संहिता म्हणजे काय ?

उत्तरः—मंत्रात्मक भागास ‘ संहिता ’ म्हणतात. मन्त्र म्हणजे स्तुतिरूप असणारे छन्दोबद्ध भाग होत. याला फक्त यजुर्वेदाच्या कांहीं संहिता अपवाद आहेत. यजुर्वेदांत संहिता ब्राह्मणमिश्रित आहेत.

प्रश्नः—ब्राह्मण म्हणजे काय ?

उत्तरः—विधि म्हणजे अमुक करा, अमुक करूं नका असें सांगणाऱ्या ग्रंथास ‘ ब्राह्मण ’ असें म्हणतात.

प्रश्नः—आरण्यक म्हणजे काय ?

उत्तरः—आरण्यक आणि उपनिषदें हीं एकाच स्वरूपाचीं असतात. दोन्हींमध्यें तत्त्वज्ञानावर भर असतो. आरण्यकांत कर्ममार्गाचें जरा जास्त प्रतिपादन असतें.

प्रश्नः—संहिता चारच आहेत कां जास्त आहेत ?

उत्तरः—जास्त आहेत. प्रत्येक वेदाच्या कांहीं तरी कारणानें बऱ्याच शाखा होत्या; आणि त्यामुळें संहिता व ब्राह्मण यांचे बरेच ग्रंथ असावेत असें जुन्या ग्रंथांवरून दिसतें.

प्रश्नः—ऋग्वेद म्हणजे काय ?

उत्तरः—ऋच् म्हणजे छन्दांत असणारे मन्त्र, त्यांचा संग्रह केलेला जो वेद तो ऋग्वेद होय. यामध्यें अग्नि, इंद्र, वरुण, सोम, अश्वी मरुत् वगैरे देवतांच्या स्तुतिपर अनेक वृत्तांतील सूक्तें आहेत. ऋचांनीं युक्त असणारा हा वेद म्हणून यास ऋग्वेद असें म्हणतात.

प्रश्नः—वेदमूलक ग्रंथ कोणते ?

उत्तरः—*स्मृति आणि *पुराणें.

प्रश्नः—स्मृति म्हणजे काय ?

उत्तरः—धर्मशास्त्राला स्मृति असें म्हणतात. त्यामध्यें धर्मप्रतिपादक सूत्रें, स्मृति आणि पुराण ग्रंथांतील धर्मविषयक वचनांचा समावेश होतो.

प्रश्नः—पुराण म्हणजे काय ?

उत्तरः—वेद आणि स्मृति यांमध्यें सांगितलेल्या तत्त्वांचा इतिहासांतील कथांच्या साहाय्यानें प्रतिपादन करणाऱ्या ग्रंथांस ' पुराणें ' असें म्हणतात.

प्रश्नः—स्मृति आणि पुराणें यांना स्वतंत्र प्रामाण्य आहे काय ?

उत्तरः—नाहीं. वेदमूलक म्हणून प्रामाण्य आहे. वेदविरुद्ध गोष्टी स्मृति किंवा पुराणांत आढळल्यास त्या धर्मविरुद्ध किंवा खोट्या समजण्यास हरकत नाहीं.

प्रश्नः—प्रामाण्य म्हणजे काय ?

उत्तरः—मान्यता असणें. मान्यता असली म्हणजे एकूण एक गोष्ट अमलांत आणलीच पाहिजे असें नाहीं.

## संस्कृति.

प्रश्नः— संस्कृति म्हणजे काय ?

उत्तरः—आम्हा आर्यांची प्राचीन विद्या आणि आचार पाळणें यास 'संस्कृति' असें म्हणतात.

---

* पृष्ठ १३—१४ पहा.

प्रश्न:—या संस्कृतीचें थोडक्यांत स्वरूप काय ?

उत्तर:—ज्ञान, यज्ञ, दान, तप आणि शौच हें होय.

प्रश्न:—यज्ञ म्हणजे काय ?

उत्तर:—देवांचें ज्ञानपूर्वक पूजन करणें. पूजन म्हणजे सर्व प्रकारचे संस्कार होत.

प्रश्न:—दान म्हणजे काय ?

उत्तर:—पूज्य व्यक्तींना प्रिय वस्तु मन:पूर्वक व नम्रतेनें देणें यास दान असें म्हणतात.

प्रश्न:—तप म्हणजे काय ?

उत्तर:—वर्णाश्रमधर्माप्रमाणें आपणावर आलेली जबाबदारी योग्य रीतीनें पार पाडणें यास तप असें म्हणतात. ( तपःस्वधर्म-वर्तित्वम्. )

प्रश्न:—शौच म्हणजे काय ?

उत्तर:—शौच म्हणजे शुद्धता. वंश, आचार व विचार ह्या सर्वांच्या शुद्धतेचा शौचांत अंतर्भाव होतो. ( शौचः संकरवर्जनम्. )

प्रश्न:—यांत कांहीं भेद आहेत काय ?

उत्तर:—होय. कायिक, वाचिक आणि मानसिक हे तीन भेद प्रत्येकांत आहेत.

---

# संस्कार

प्रश्न:—संस्कार म्हणजे काय ?

उत्तर:—शरीर आणि मन हीं उत्तम गुणांनीं युक्त होण्यास केल्या जाणाऱ्या शास्त्रोक्त क्रिया, त्यांस ‘ संस्कार ’ असें म्हणतात.

प्रश्नः–संस्कार किती आहेत ?

उत्तरः–शास्त्रांत सांगितलेले एकंदर संस्कार अठ्ठेचाळीस आहेत त्यांत सोळा विशेष मानले जातात.

प्रश्नः–सोळा संस्कार कोणते ?

उत्तरः–गर्भाधान, पुंसवन, सीमन्तोन्नयन, जातकर्म, नामकर्म, अन्नप्राशन, चूडाकर्म ( चौल ), उपनयन, मेधाजनन महानाम्नी, महाव्रत, उपनिषद्, गोदान, समावर्तन, विवाह व अन्त्येष्टि.

---

## आचार.

प्रश्नः—आचार म्हणजे काय ?

उत्तरः—आचार म्हणजे वर्तणूक. विशेषतः धर्मविषयक वर्तणुकीला आचार हा शब्द लाविला जातो.

प्रश्नः—हिंदुधर्माचे मुख्य आचार कोणते ?

उत्तरः—भजन, पूजन आणि मनन ह्यांपैकीं कांहींहि केलें असतां हिंदुधर्माचे आचार पाळले असें होतें. पंचमहायज्ञांचा ह्यामध्येंच समावेश होतो.

प्रश्नः—हिंदुधर्माची सर्वसामान्य खूण कोणती ?

उत्तरः—शेंडी आणि तिलक. जानवें फक्त त्रैवर्णिक धारण करतात

प्रश्नः--धर्मविधि कोणामार्फत करावेत ?

उत्तरः- धर्मशील ब्राह्मणद्वारा करावेत किंवा स्वतः करावेत. कोणाहिमार्फत केले, तरी ते विधि यथासांग होतात किंवा नाहीं याचे ज्ञान कर्त्यास आवश्यक आहे.

| वेद | मूळ शाखा | उपलब्ध शाखा. | ब्राम्हण | आरण्यक | उपनिषद | श्रौतसूत्र | गृह्यसूत्र | धर्मसूत्र |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ऋग्वेद | २१ | (१) [illegible]कल (या शाखेची संहिता अगदीं शुद्ध स्वरूपांत संपूर्ण उपलब्ध आहे.)<br>(२) बाष्कल (या शाखेची संहिता उपलब्ध नाहीं. त्यांतील कांहीं मंत्र उपलब्ध आहेत.) | (१) ऐतरेय ब्राह्मण<br>(२) कौषितकी ब्राह्मण (ऊर्फ [illegible] किंवा [illegible]) | (१) ऐतरेय आरण्यक<br>(२) सांख्यायन आरण्यक | (१) ऐतरेय (ऐतरेय आरण्यकांतील २-३-६ भाग)<br>(२) कौषितकी (सांख्ययन आरण्यकांतील ३ते६ भाग)<br>(३) बाष्कल (हें बाष्कल शाखेचें उप० आहे.) | (१) आश्वलायन<br>(२) सांख्यायम ऊर्फ कौषितकी | (१) आश्वलायन<br>(२) सांख्यायन ऊर्फ कौषितकी | (१) वसिष्ठ |
| कृष्णयजुर्वेद | ८५ | (१) तैत्तिरीय<br>(२) मै[illegible]यणी<br>(३) कठ<br>(४) कापिष्ठिल<br>(५) श्वेताश्वतर | (१ तैत्तिरीय संहितांतर्गत ब्राह्मण (२) तैत्तिरीय ब्राह्मण | (१) तैत्तिरीय आरण्यक | (१) तैत्तिरीय (तैत्तिरीय आरण्यक भाग ६ ते ९<br>(२) महानारायण (भाग १७)<br>(३) मैत्रायाणी<br>(४) काठ "<br>(५) श्वेताश्वतर | (१) आपस्तंब<br>(२) बौधायन<br>(३) हिरण्यकेशी (सत्याषाढ)<br>(४) भारद्वाज<br>(५) वैखानस<br>(६) वाधूल<br>(७) मानध (मैत्रायाणी शाखेचें.)<br>(८) वाराह. | (१) मानव | (१) आपस्तंब<br>(२) बौधायन<br>(३) हिरण्यकेशी |
| शुक्लयजुर्वेद | १६ | (१) काण्व<br>(२) माध्यादिन (वाजसनेय) | (१) शतपथ ब्राह्मण (हा शाखाभेदाप्रमाणें भिन्न आहे. काण्वशाखेचा १७ काण्डाचा व माध्यंदिन शाखेचा १४ काडांचा आहे.) | (१ बृहदारण्यक (काण्व शाखेच्या ब्राम्हणांतील १७वें माध्यंदिन शाखेच्या ब्राम्हणांतील १४ वे काण्ड. | (१) ईशावास्य (संहितेंतील ४० वा अध्याय.<br>(२) बृहदारण्यक (बृहदारण्यकांतील ३ते८ भाग कण्व शाखेचे व ४ते९ भाग माध्यंदिन शाखेचे.) | (१) कात्यायन (ऊर्फ पारस्कर) | (१) कात्यायन (उर्फ पारस्कर) | |
| सामवेद | १००० | (१) कौथुम<br>(२) राणायनीय } या दोन शाखांच्या संहिता शुद्ध स्वरूपांत संपूर्ण उपलब्ध आहेत.)<br>(३) जैमिनीय (या शाखेची संहिता संपूण उपलब्ध नाहीं.) | (१) पंचविंश (प्रौढ किंवा तांड्य ब्राह्मण) (२) षड्विंश (३) सामविधान (४) आर्षेय (५) मंत्र (६) दैवताध्याय (७) वंश (८) संहितोपनिषद् ब्राह्मण (९) जैमनीय ब्राह्मण (१०) जैमिनीयोपनिषद् ब्राह्मण (११) आषय ब्राह्मण. | | (१) छांदोग्य<br>(२) केन (जैमिनीयोपनि० ब्राम्हणांतील ४।१८।२१ हे भाग). | (१) खादिर<br>(२) लाट्यायन<br>(३) द्राह्यायण | (१) खादिर<br>(२) गोभिल<br>(३) गौतम | (४) गौतम |
| अथर्ववेद | ९ | (१) पैप्पलेय<br>(२) शौनक | (१) गोपथ ब्राह्मण. | | (१) प्रश्न (२) मांडुक्य (३) मुंडक (व अलीकडची पुष्कळ मिळून १५.) | (१) वैतान | (१) कौशिक | |

टीपः–धर्मसूत्रांवरून स्मृत्या झाल्या. वेद म्हणण्याची पद्धति सांगण्याकरितां शिक्षाग्रंथ निर्माण झाले. वेदाचें व्याकरण समजावून देणारा ग्रंथ प्रातिशाख्य होय. शिक्षाप्रमाणें व प्रातिशाख्य प्रत्येक वेदाचें वेगवेगळे आहेत.

# चातुर्वर्ण्य.

प्रश्न:–वर्ण म्हणजे काय ?

उत्तर:–समाजव्यवस्थेकरितां समाजांत निर्माण केलेला भेद यास 'वर्ण' असें म्हणतात.

प्रश्न:–वर्ण किती आहेत ?

उत्तर:—चार आहेत. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र. या चार वर्णांनीं व्यवस्थापिलेल्या समाजास चातुवर्ण्यघटित समाज असें म्हणतात.

प्रश्न:--हे वर्ण कोणच्या तत्त्वावर विभागले आहेत ?

उत्तर:—समाजव्यवस्था आणि श्रमविभाग या तत्त्वांवर उभारले आहेत.

प्रश्न:—ब्राह्मणावर या व्यवस्थेनें कोणती कामगिरी सोपविलेली आहे ?

उतर:--ब्राह्मणांवर बुद्धीचें काम सोपविलें आहे. समाजाचा सर्व प्रकारें उत्कर्ष होण्यास ज्या ज्या ज्ञानाची आवश्यकता लागेल त्या प्रकारच्या ज्ञानाचा पुरवठा व साठा करणें हें ब्राह्मणांचें काम होय.

प्रश्न:—ब्राम्हणवर्गाचें महत्व काय ?

उत्तर:—हिंदुधर्माचें ध्येय प्रत्येक हिंदूची पूर्ण उन्नति करून त्याला मोक्षप्राप्ति करून देणें हें असल्यामुळें तें ध्येय साधण्याकरितां अत्यंत उच्च धर्माचरण कोणतें तें सांगितलें आहे; व तें उच्च धर्माचरण ब्राह्मणवर्गानें अत्यंत कडक रीतीनें पाळावें अशी ब्राह्मणवर्गावर हिंदुधर्मानें जबाबदारी टाकलेली आहे. म्हणून ब्राह्मणवर्ग श्रेष्ठ होय.

प्रश्न:—क्षत्रियांचें काम काय ?

उत्तर:—शत्रूपासून राष्ट्रांचें संरक्षण करणें आणि ब्राम्हणादि वर्णांना स्वकार्यतत्पर ठेवणें.

प्रश्न:—वैश्यांचें काम काय ?

उत्तर:—सर्व प्रकारचा व्यापार करून धनसंपादन करणें आणि त्या धनाचा उपयोग क्षत्रिय, ब्राह्मण आणि शूद्र यांच्याकरितां करणें.

प्रश्न:—शूद्रांचें काम काय ?

उत्तर:—ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य यांच्या प्रत्येक कार्यास मदत करणें हें होय.

प्रश्न:—यांपैकीं कोणींहि स्वकर्मापासून च्युत झाल्यास आणि आपआपली जबाबदारी सोडल्यास काय होतें ?

उत्तर:—त्यांना मोक्ष मिळत नाहीं, समाज दुबळा होतो, आणि याची सर्व जबाबदारी ब्राह्मण व क्षत्रिय यांच्यावर येते.

प्रश्न:—कोणताहि वर्ण आपल्या कामापासून च्युत झाल्यास काय करावें.

उत्तर:—इतर वर्णांनीं त्याचें काम त्याला करण्यास भाग पाडावें, नाहीं तर समाजांत त्याला निंद्य करून सोडावें.

प्रश्न:—चातुर्वर्ण्य हें गुणावर अवलंबून आहे कां जन्मावर अवलंबून आहे ?

उत्तर:—एक काळ असा होता कीं, त्या वेळीं चातुर्वर्ण्यामध्यें इतका कडक भेद निर्माण झाला नव्हता, असें बऱ्याच उदाहरणांवरून दिसतें. तथापि जन्मावरूनच चातुर्वर्ण्य पुढें धर्मशास्त्रज्ञांनीं ठरविलें; आणि सध्यांहि त्याप्रमाणेंच मानण्यांत येतें. नवीन शास्त्रज्ञांनीं त्यामध्यें इतकीच जास्त व्यवस्था केली कीं, पूर्वीं ब्राह्मणादि त्रैवर्णिकांशिवाय इतरांना मोक्षाचा अधिकार नव्हता, तो सर्वांना

मान्य करण्यांत आला. हा चातुर्वर्ण्यांतील पूर्वीच्या दृष्टीनें सध्यां विशेष आहे.

प्रश्नः–जाति ह्मणजे काय ?

उत्तरः–भिन्न चालीरीती, भिन्न आचार, आणि भिन्न धंदे यामुळें उत्पन्न झालेल्या समाजांतील गटांस जाती असें म्हणतात.

प्रश्नः–अस्पृश्य म्हणजे काय ?

उत्तरः–सामाजिक किंवा धार्मिक निन्द्य आचरण केलें असतां समाजानें बहिष्कृत केलेल्या माणसास अस्पृश्य असें म्हणतात.

प्रश्नः––अस्पृश्यता कां उत्पन्न झाली ?

उत्तरः—धर्माचरणांत शक्य तितकी पवित्रता रहावी येवढ्या करितां.

प्रश्नः—धर्माचरणाशिवाय इतरत्र अस्पृश्यता मानणें जरूर आहे काय ?

उत्तरः—नाहीं. लौकिक व्यवहारांत अस्पृश्यता मानण्याचें कारण नाहीं.

प्रश्नः–क्षत्रिय आणि वैश्य सध्यां आहेत का नाहींत ?

उत्तरः–आहेत. ते नष्ट होणें केव्हांही शक्य नाहीं. मात्र परिस्थितिभेदानें त्यांच्या गुणांमध्यें न्यूनाधिक्य होतें इतकेंच.

## आश्रमव्यवस्था.

प्रश्नः–आश्रम म्हणजे काय ?

उत्तरः–विद्यार्जन, प्रपंच व मोक्षसाधन याकरितां धर्मग्रंथांनीं दिलेल्या कालमर्यादेस आश्रम असें म्हणतात.

प्रश्नः–आश्रम किती आहेत ?

उत्तर:--चार आहेत. ब्रह्मचर्याश्रम, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम, व संन्यासाश्रम.

प्रश्न:—ब्रह्मचर्याश्रम म्हणजे काय ?

उत्तर:--ब्रह्म म्हणजे ज्ञान आणि 'चर्य' म्हणजे नियमबद्ध वर्तन. विद्यार्जनाच्या कालास ब्रह्मचर्य असें म्हणतात. हा काल उपनयन झाल्यापासून विवाहापर्यंत असतो. विद्यासंपादन होईपर्यंत विद्यार्थि गुरुगृहीं रहात असे.

प्रश्न:—गृहस्थाश्रम म्हणजे काय ?

उत्तर:—विद्यार्जन संपवून विवाह करून प्रपंच करणें व धर्म, अर्थ व काम साधणें म्हणजे धर्मविहित आचरण ठेवून धनोत्पादन व प्रजोत्पादन करणें.

प्रश्न:--वानप्रस्थ म्हणजे काय?

उत्तर:—गृहस्थाश्रम सोडून लोकसेवा करीत धर्माचरणपूर्वक वैराग्य वृत्तीनें राहण्याचा अभ्यास करणें. यास वानप्रस्थाश्रम असें म्हणतात.

प्रश्न:—संन्यास म्हणजे काय?

उत्तर:—पूर्ण वैराग्यानें मोक्षप्राप्तीचा यत्न करणें यास संन्यासाश्रम म्हणतात.

या चारहि आश्रमांचे विधि, आचार वगैरे स्मृतिग्रंथांत सविस्तर सांगितले आहेत ते जिज्ञासूंनीं पहावेत.

---

## तत्वज्ञान.

प्रश्न:—हिंदुधर्माचीं मुख्य तत्वें कोणतीं ?

उत्तर:--पुनर्जन्म आणि कर्मानुरूप फलप्राप्ति हीं होत.

प्रश्नः—पुनर्जन्म म्हणजे काय ?

उत्तरः—मोक्ष प्राप्त होईतोंपर्यंत जन्म आणि मरण ह्यांच्या फेऱ्यांत असणें ह्यास 'पुनर्जन्म' म्हणतात.

प्रश्नः—कर्मानुरूप फलप्राप्ति म्हणजे काय ?

उत्तरः—जसें कर्म केलें असेल, त्याप्रमाणें ह्या जन्मीं किंवा पुढील जन्मीं फलप्राप्ति होणें यास कर्मानुरूप फलप्राप्ति असें म्हणतात.

प्रश्नः—मोक्ष म्हणजे काय ?

उत्तरः—जीव आणि आत्मा यांचें ऐक्य होऊन आत्मरूप बनणें यास 'मोक्ष' असें म्हणतात.

प्रश्नः—इतर धर्मानें मोक्ष मिळणें शक्य आहे कीं नाहीं ?

उत्तरः—नाहीं. ते धर्म मोक्षप्राप्तीला उपयोगी असणाऱ्या कांहीं गुणांचा उत्कर्ष करतात इतकेंच. मोक्ष प्राप्त होण्यास हिंदुधर्मच स्वीकारला पाहिजे, किंवा या जन्मीं सदाचरणानें आत्मशुद्धि करून दुसऱ्या जन्मांत हिंदु होण्याची इच्छा केली पाहिजे.

---

## पतितपरावर्तन.

प्रश्नः— परधर्मांत गेलेला हिंदू पुनः हिंदू होऊं शकतो कीं नाहीं ?

उत्तरः— होऊं शकतो. याबद्दल देवल स्मृतींत चांगला विचार केला आहे, आणि वेदग्रंथांपासून अर्वाचीन कालापर्यंत या गोष्टीस आधार आहे.

प्रश्नः—परधर्मीय माणसास हिंदु होतां येतें कीं नाहीं ?

उत्तरः—कोणत्याही धर्मांतील माणसास हिंदु होण्यास हरकत नाहीं;म्हणूनच पूर्वीं अनार्य, शक व अनेक इतर जाती हिंदूंत समाविष्ट होऊं शकल्या.

प्रश्नः—पुराणमतवादी हिंदु अशा लोकांना जवळ करतील काय ?

उत्तरः—नाहीं. अशा विचारसरणीचे लोक कोणत्याही धर्मांत असतातच. त्यांत त्यांचा उद्देश इतकाच असतो कीं, धर्मांत कडवे धार्मिक लोक असावेत, अर्धवट नसावेत.

प्रश्नः—परधर्मीय लोक हिंदु झाल्यास हिंदू लोक त्यांचा कोणत्या जातींत स्वीकार करतील ?

उत्तरः—विशिष्ट मुदतींत बाटलेला मनुष्य पुनः हिंदूंत येत असेल, तर त्याचा त्याच जातींत स्वीकार केला जातो. परंतु मर्यादेच्या बाहेरील किंवा हिंदुकुलामध्यें उत्पन्न न झालेल्या परधर्मीयांस वेगळी जात म्हणून हिंदूंत समाविष्ट केलें जातें. अशा अनेक जाती हिंदूंत समाविष्ट केल्या गेल्या आहेत.

---

## ईश्वर निराकार आणि एक आहे.

प्रश्नः—ईश्वर एक आहे कीं अनेक आहेत ?

उत्तरः—ईश्वर एकच आहे. अनेक नाहींत.

प्रश्नः—मग विष्णु, कृष्ण, विठ्ठल, गणपति, मारुति वगैरे देव अनेक दिसतात हें कसें ?

उत्तरः—मनुष्यप्राण्यांनीं कल्पिलेले हे प्रकार आहेत. हे खरे नव्हेत. मनुष्यप्राणी आपल्या मनाची एकाग्रता होण्याकरितां मनाला रुचेल तो आकार देवाला देऊन देवाची उपासना करीत असतो. त्यामुळें ईश्वर साकार आणि अनेक आहेत असा अज्ञ लोकांस भास होतो. वस्तुतः ईश्वर निराकार आणि एकच आहे.

प्रश्नः—ईश्वर कोठें असतो ?

उत्तरः—स्थिर आणि चर सृष्टींत म्हणजे चहूंकडे ईश्वर भरलेला आहे.

## मूर्तिपूजा.

प्रश्नः- हिंदूनीं कोणत्या देवाची उपासना केली पाहिजे ?

उत्तरः—अमक्याच देवतेची उपासना केली पाहिजे असा हिंदु धर्माचा हट्ट नाहीं. मात्र आस्तिक्य बुद्धि असली पाहिजे.

प्रश्नः--मूर्तिपूजा म्हणजे काय ?

उत्तरः--मूर्ति म्हणजे आकार. साकार देवतेची उपासना करणें यास ' मूर्तिपूजा ' असें म्हणतात.

प्रश्नः—मूर्तिपूजा हिंदूना आवश्यक आहे काय ?

उत्तरः—नाहीं. मूर्तिपूजा ही एक पायरी आहे. निर्गुण निराकार परमेश्वराचें ध्यान करणें हिंदुधर्माचें उच्च आणि मुख्य तत्त्व आहे.

---

## धर्म आणि व्यवहार.

प्रश्नः—धर्म आणि व्यवहार यांचा संबंध आहे काय ?

उत्तरः-आहे. धर्माशीं संबंध नाहीं असा एकही व्यवहार असूं शकत नाहीं. प्रत्येक ठिकाणीं धर्म आहे.

---

## स्मृतिग्रंथ

उपलब्ध स्मृतिग्रंथांची अकारादि वर्णक्रमानें यादी—

१ अंगिरा २ अत्रि ३ आत्रेय ४ आपस्तंब ५ उसना ६ ऋष्यशृंग ७ कपिंजल ८ काश्यप ९ काणाद १० कात्यायन ११ कार्ष्णाजिनि १२ कुतुमी १३ कृतु १४ गार्ग्य १५ गोभिल १६ गोतम १७ च्यवन १८ छागलेय १० जमदग्नि २० जातुकर्ण्य २१ जाबालि २२ दक्ष २३ देवल २४ नाचिकेत २५ नारद २६ पाराशर २७ [illegible] २८ पितामह २९ पुलस्त्य ३० पुलह

३१ पैठिनासि ३२ प्रचेतस् ३३ प्रजापति ३४ बभ्र ३५ बृहस्पति ३६ बैजवाप ३७ बौधायन ३८ भरद्वाज ३९ भृगु ४० मनु ४१ मरीचि ४२ मय ४३ याज्ञवल्क्य ४४ लौगाक्षि ४५ लोमश ४६ वशिष्ठ ४७ वसु ४८ वत्स ४९ विश्वामित्र ५० विष्णु ५१ व्याघ्र ५२ व्यास ५३ शंखलिखित ५४ शातातप ५५ शौनक ५६ सत्यव्रत ५७ सनत्कुमार ५८ संवर्त ५९ सुमंतु ६० सोम ६१ स्कंद ६२ हारित.

**टीपः**—या शिवाय अनेक स्मृतींचीं वचनें प्रमाण म्हणून उल्लेखिली जातात. हल्लीच्या छापलेल्या स्मृतींपैकीं पुष्कळ स्मृति मान्य निबंधकारांनीं उध्दृत केलेल्या वचनांशीं पडताळून पहातां कृत्रिम आहेत असें दिसतें.

---

## पुराणें

पुराणें अठरा आहेत. तीं क्रमानें खालील प्रमाणें आहेत.

१ अग्नि २ कूर्म ३ गरुड ४ नारद ५ पद्म ६ ब्रह्म ७ ब्रह्मवैवर्त ८ ब्रह्माण्ड ९ भविष्य १० भागवत ११ मत्स्य १२ मार्कंडेय १३ लिंग १४ वराह १५ वामन १६ विष्णु १७ शिव १८ स्कंद

हीं पुराणें व्यासांनीं मूळ रचिलीं असून निरनिराळ्या मुनींनीं त्यावर संस्कार केले आहेत. त्याचप्रमाणें महाभारत हा इतिहासहि निर्माण झाला आहे. या भारतासह एकंदर पुराणांची श्लोकसंख्या पांच लक्ष आहे (मत्स्यपुराण५३–७२). हल्लीच्या पुराणांत अनेक प्रक्षिप्त भाग आढळून येतात. पण प्रत्येक पुराणांत कोणकोणते विषय आहेत याची एक विस्तृत सूचि नारदपुराणांत दिलेली आहे. त्यावरून बर-

च प्रक्षिप्त भाग उघड होतील. हल्ली वेंकटेश्वर प्रेसमध्यें सर्व पुराणें छापलीं आहेत. पण वरील सूचीवरून पहातां पुष्कळ भाग अप्रसिद्ध आहेत असें दिसतें. उदाहरणार्थ—अग्निपुराणांतील ईशानकल्पवृत्तान्त भविष्यांतील शैव व सौर पर्व, कूर्मांतील सौरी व वैष्णवी संहिता. नवीन संशोधाकरितां स्मृति व पुराण हें वाङ्मय शिल्लक आहे.

# सूचि.


| | | | |
|---|---|---|---|
| १ धर्म म्हणजे काय ? | .... | .... | १ |
| २ धर्म श्रेष्ठ कोणता ? | .... | .... | १ |
| ३ हिंदुधर्माची व्याख्या | .... | .... | १ |
| ४ हिंदूंचा धर्मग्रंथ | .... | .... | २ |
| ५ संस्कृति | .... | .... | ४ |
| ६ संस्कार | .... | .... | ५ |
| ७ आचार | .... | .... | ६ |
| ८ चातुर्वर्ण्य | .... | .... | ७ |
| ९ आश्रमव्यवस्था | .... | .... | ९ |
| १० तत्त्वज्ञान | .... | .... | १० |
| ११ पतितपरावर्तन | .... | .... | ११ |
| १२ ईश्वर निराकार आणि एक आहे | | .... | १२ |
| १३ मूर्तिपूजा | .... | .... | १३ |
| १४ धर्म आणि व्यवहार | .... | .... | १३ |
| १५ स्मृतिग्रंथ | .... | .... | १३ |
| १६ पुराणें | .... | .... | १४ |
| १७ वेदशाखाविस्तार | .... | .... | १ परिशिष्ट |

महाराष्ट्रांतील धार्मिक मुखपत्र

# स्व धर्म

## दर गुरुवारीं प्रसिद्ध होतें.

**वार्षिक वर्गणी टपाल हंशीलासह २॥१५.**

**स्व**धर्मांत—धार्मिक दृष्टीनें राजकीय व सामाजिक प्रश्नांची चर्चा होते.

**स्व**धर्मांत—जगांतील धार्मिक घडामोडीची स्फूर्तिदायक व सुंदर माहिती येते.

**स्व**धर्मांत—हिंदुस्थानांतील धार्मिक चळवळीचें मार्मिक परीक्षण होते.

**स्व**धर्मांत—जुन्यानव्यांचें ऐक्य घडवून आणण्याचा प्रयत्न होत असून व्यवहारिक वेदांगाचें हृदयंगम विवरण होतें.

पत्ताः—**स्वधर्म कार्यालय,**
घ. नं. २७ बुधवार पेठ, पुणें.

---

मुद्रकः—**शंकर रामचंद्र दाते,** ‘ लोकसंग्रह छापखाना, ”
पेठ बुधवार घ. नं. २७ पुणें.